# तक्रार निवारण समिती, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

## तक्रार अर्ज क्रं.०३/२०२५

श्री.जाधव कृष्णत उत्तम
मु.पो.सैदापूर, ता.कराड, जि.सातारा } तक्रार अर्जदार

विरूध्द्

१. जी.के.गुजर मेमोरिअल चॅरिटेबल ट्रस्ट, कराड,
जि. सातारा.

२. डॉ.अशोक गुजर टेक्नि.इन्सि. डॉ.दौलतराव आहेर
कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग, कराड, जि.सातारा. } वि.प.

जी.के.गुजर मेमोरिअल चॅरिटेबल ट्रस्ट, कराड, जि. सातारा यांचे डॉ.अशोक गुजर टेक्निकल इन्सि. डॉ.दौलतराव आहेर कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग, कराड, जि.सातारा यांचेकडील सहा. प्राध्यापक श्री.जाधव कृष्णत उत्तम यांनी तक्रार निवारण समितीकडे दि.२३/०१/२०२५ रोजी तक्रार अर्ज दाखल केला आहे. अर्जामध्ये नमूद तक्रार पुढील प्रमाणे.

**तक्रारीचे स्वरूप :**

मी वरील नमूद महाविद्यालयात दि.१६/०१/२०१४ पासून आजपर्यंत सलगपणे सहा. प्राध्यापक या पदावर कार्यरत आहे. विद्यापीठ परिनियमातील तरतूद ५-२०८ प्रमाणे व्यवस्थापनाने सदर सर्व्हिस बुकची एक प्रत देणे बंधनकारक आहे. परंतु सदर व्यवस्थापनाने मला आज रोजीपर्यंत एकदाही सर्व्हिस बुकची प्रत दिलेली नाही. तरी सदर व्यवस्थापनाने परिनियमातील तरतूदीप्रमाणे सर्व्हिस बुकची प्रत नियमाप्रमाणे देण्याचे आदेश व्हावेत, ही विनंती.

**महाविद्यालयाचा अभिप्राय :**

श्री.के.यु.जाधव यांची तक्रार ही सेवा पुस्तकाची एक प्रत देण्यासंबधी आहे. त्यांच्या मागणीनुसार महाविद्यालयाने त्यांना सेवा पुस्तकाची एक प्रत दिली असता त्यांनी ती घेण्यास नकार दिला. त्यामुळे एक प्रत पोस्टाने त्यांच्या पत्यावर पाठविली आहे. तसेच Soft Copy त्यांच्या मेलला पाठविली आहे. त्यामुळे संबधित तक्रारीचे निवारण झाले आहे.

**समितीची निरिक्षणे :**

प्रस्तुत प्रकरणी आजरोजी सुनावणी घेतल्या नंतर जाबदारातर्फे तक्रारदारास त्याच्या सेवापुस्ताकाची प्रत या समितीसमोर देण्यात आली आहे. सदरची प्रत मिळाल्यानंतर तक्रारदारांनी पडताळणी करून तक्रारअर्जावर त्याच्या सेवापुस्तकाची प्रत मिळाली आणि तक्रारीचे निवारण झाले असे या समितीसमोर लिहून दिले व स्वाक्षरी केली. त्यामुळे या प्रकरणातील मागणीची पूर्तता झाल्याने या तक्रार अर्जास कारण उरत नाही. सबब प्रस्तुतची तक्रार खारिज करण्यात येत आहे.

**आदेश**

तक्रार खारिज करण्यात येत आहे.

झालेल्या निर्णयाच्या प्रती संबधिताना देऊन तसे कळविणेत यावे.

**दिनांक :** 29 JUL 2025

सदस्य सचिव
(श्रीमती ए.ए.कदम)

सदस्य
(श्रीमती ए.एच.कोलेकर)

सदस्य
(प्रा.डॉ.एस.पी.हंगिरगेकर)

सदस्य
(डॉ.व्ही.एन.शिंदे)

सदस्य
(श्री.एस.यु.शिंदे)

सदस्य
(प्रा.डॉ.एस.एस.महाजन )

अध्यक्ष
(श्री.ए.व्ही.देशपांडे)